Epaper
डिजिटल क्रांतीची धगधगती मशाल
MSME - MH-33 -0714843


# दैनिक जन सत्याचे प्राईम्स सम्राट टाईम्स

मुख्य संपादक: मुकुंदराव शामराव नंन्नवरे

। रविवार, दि. ०५ जूलै २०२६ । वर्ष १ । अंक ८७ । पाने २। Title Code - T/MH/2026/0422/5204/1306 DIGITAL EDITION

हतनूर धरणाचे २२ दरवाजे १ मीटरने उघडले

(पान २ वर)



## भाजपवर धर्माच्या नावावर राजकारण व भ्रष्टाचाराचे गंभीर आरोप

# राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्ष काँग्रेसमध्ये विलीन होणार?

## 'विरोधकांची एकजूट खिळखिळी करण्यासाठी अपप्रचार; अफवांवर प्रदेशाध्यक्ष शशिकांत शिंदेंचे स्पष्ट उत्तर

**जन सम्राट टाईम्स**

**पुणे | राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार) पक्ष काँग्रेसमध्ये विलीन होणार असल्याच्या चर्चांना पक्षाचे प्रदेशाध्यक्ष शशिकांत शिंदे यांनी स्पष्ट शब्दांत फेटाळून लावत, अशा कोणत्याही प्रकारची चर्चा पक्षात किंवा काँग्रेससोबत झालेली नसल्याचे सांगितले. विरोधी पक्षांची एकजूट कमकुवत करण्यासाठी आणि राजकीय अस्थिरता निर्माण करण्याच्या उद्देशानेच या अफवा मुद्दाम पसरवल्या जात असल्याचा आरोप त्यांनी केला.**

पुणे, पिंपरी-चिंचवड शहर आणि जिल्ह्यातील पक्ष पदाधिकारी व कार्यकर्त्यांच्या बैठकीनंतर पत्रकारांशी संवाद साधताना शिंदे बोलत होते. यावेळी पक्षाचे प्रवक्ते अंकुश काकडे, शहराध्यक्ष श्रीकांत पाटील यांच्यासह अनेक पदाधिकारी उपस्थित होते.

शिंदे म्हणाले की, अलीकडेच शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षातील घडामोडीनंतर राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार) पक्षाबाबतही विविध प्रकारच्या अफवा पसरविल्या जात आहेत. मात्र, पक्ष काँग्रेसमध्ये विलीन होणार असल्याचा प्रश्नच उद्भवत नाही. पक्षाची वाटचाल शरद पवार आणि सुप्रिया सुळे यांच्या नेतृत्वाखालीच सुरू राहणार असून, याबाबत खासदार डॉ. अमोल कोल्हे यांनीही भूमिका स्पष्ट केली असल्याचे त्यांनी नमूद केले.





राज्यातील सत्ताधाऱ्यांवर टीका करताना शिंदे यांनी विविध विकासकामांच्या गुणवत्तेवरही प्रश्नचिन्ह उपस्थित केले. पुण्यातील 'कनेक्टिंग लिंक' प्रकल्पातील कथित निकृष्ट दर्जाच्या कामाचा उल्लेख करत त्यांनी सरकार कंत्राटदारांना पाठीशी घालत असल्याचा आरोप केला. राज्यात सर्व स्तरांवर सत्ता असूनही विकासकामांमध्ये पारदर्शकता नसल्याची टीकाही त्यांनी केली.

राज्यात कायदा आणि सुव्यवस्थेची स्थिती ढासळल्याचा आरोप करत त्यांनी गृह विभागावरही निशाणा साधला. पोलिसांचा धाक कमी झाल्यामुळे गुन्हेगारी वाढत असल्याचा दावा करत नागरिकांमध्ये असुरक्षिततेची भावना निर्माण झाल्याचे ते म्हणाले. धर्माच्या मुद्द्यावरून भाजपवर टीका करताना शिंदे म्हणाले की, धर्माच्या नावाखाली राजकारण करून आर्थिक लाभ मिळविण्याचा प्रयत्न सुरू आहे. राम मंदिराच्या नावाने भावना जागृत करून सत्ता मिळवली जात असून, देणग्यांच्या वापराबाबतही अनेक प्रश्न उपस्थित होत आहेत. या संदर्भात राष्ट्रीय स्वयंसेवक संघानेही काही मुद्द्यांवर नाराजी व्यक्त केल्याचा उल्लेख त्यांनी केला. नाशिक कुंभमेळ्याच्या तयारीतील रस्ते विकासकामांमध्ये कोट्यवधी रुपयांच्या कथित गैरव्यवहाराचा मुद्दा विधिमंडळात उपस्थित झाल्याचे सांगत, या प्रकरणाची निष्पक्ष चौकशी करण्याची मागणीही त्यांनी केली. रामभक्त आणि हिंदू समाजामध्येही या मुद्द्यांवर नाराजी वाढत असल्याचा दावा करत, देणग्यांच्या कथित गैरवापराविरोधात (शरदचंद्र पवार) पक्ष आंदोलन छेडणार असल्याचा इशाराही त्यांनी दिला. विरोधी पक्षांमध्ये संभ्रम निर्माण करण्यासाठी आणि महाविकास आघाडीची एकजूट खिळखिळी करण्यासाठी अफवांचा आधार घेतला जात असल्याचा आरोप करत शिंदे यांनी कार्यकर्त्यांना अशा चर्चांकडे दुर्लक्ष करून पक्ष संघटन मजबूत करण्याचे आवाहन केले.

- काँग्रेसमध्ये विलिनीकरणाच्या चर्चांना पूर्णविराम
- शरद पवारांच्या नेतृत्वावर विश्वास कायम
- भाजपवर धर्माच्या नावाने राजकारणाचा आरोप
- राम मंदिर देणग्या आणि कुंभमेळा कामांबाबत चौकशीची मागणी

---

**Selected**

### नानाश्री फाऊंडेशनने महावितरणच्या कारभारावर उपस्थित केले प्रश्नचिन्ह

जळगाव : जळगाव तालुक्यातील नंदगाव, पिलखेडा, नांद्रा आणि परिसरात गेल्या काही दिवसांपासून वारंवार वीजपुरवठा खंडित होत असल्याने नागरिकांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे. कोणतेही वादळ-वारे नसताना आणि अल्प पाऊस पडत असतानाही तासनतास वीज गायब होत असल्याने महावितरणच्या नियोजनावर प्रश्नचिन्ह उपस्थित केले जात आहे. वारंवार होणाऱ्या वीज खंडितामुळे विद्यार्थ्यांच्या अभ्यासावर परिणाम होत असून ज्येष्ठ नागरिक, बालके आणि रुग्णांना मोठ्या गैरसोयींचा सामना करावा लागत आहे. परिसरातील नागरिकांमध्ये याबाबत संतापाचे वातावरण निर्माण झाले आहे. नानाश्री फाऊंडेशनचे अध्यक्ष स्वप्निल सोनवणे यांनी या प्रकाराबाबत तीव्र नाराजी व्यक्त करत, "पावसाचे प्रमाण कमी असताना आणि कोणतीही नैसर्गिक आपत्ती नसताना वारंवार वीजपुरवठा खंडित होणे ही गंभीर बाब आहे.

---

**जन सम्राट टाईम्स ब्रेक न्यूज**

### अखेर बिऱ्हाड आंदोलनासमोर मनपा प्रशासन झुकले!

#### पाच दिवसांचे आंदोलन यशस्वी



**जन सम्राट टाईम्स**

**धुळे | प्रतिनिधी:** धुळे महानगरपालिकेसमोर सुरू असलेल्या पाच दिवसांच्या बिऱ्हाड आंदोलनास अखेर यश मिळाले असून, मनपा प्रशासनाने वृद्ध महिला मंडाबाई भाले यांना घरासाठी जागा उपलब्ध करून देण्यासह त्यांच्या मुलाला नोकरी देण्याचे लेखी आश्वासन दिले आहे. या निर्णयानंतर आंदोलनकर्त्यांनी बिऱ्हाड आंदोलन स्थगित करण्याची घोषणा केली.

गेल्या महिनाभरापूर्वी धुळे शहरातील जगन्नाथ नगर परिसरात अतिक्रमण असल्याच्या कारणावरून महानगरपालिकेने मंडाबाई भाले यांचे घर जमीनदोस्त केले होते. त्यानंतर न्याय मिळावा यासाठी त्यांनी सातत्याने पाठपुरावा केला. मात्र समाधानकारक निर्णय न झाल्याने दक्ष पत्रकार संघ, वंचित बहुजन आघाडी आणि सामाजिक कार्यकर्त्यांच्या पाठिंब्याने बिऱ्हाड आंदोलन सुरू करण्यात आले. पाच दिवस सुरू असलेल्या आंदोलनानंतर मनपा आयुक्तांच्या दालनात झालेल्या बैठकीत प्रशासनाने मंडाबाई भाले यांच्या प्रमुख मागण्या मान्य करत घरासाठी जागा आणि त्यांच्या मुलाला नोकरी देण्याचे लेखी आश्वासन दिले. प्रशासनाकडून लेखी पत्र मिळाल्यानंतर आंदोलन मागे घेण्यात आले. या आंदोलनाच्या यशामुळे मंडाबाई भाले तसेच आंदोलनात सहभागी सामाजिक कार्यकर्ते, पत्रकार आणि नागरिकांमध्ये समाधानाचे वातावरण निर्माण झाले. महिनाभराच्या संघर्षानंतर न्याय मिळाल्याची भावना आंदोलनकर्त्यांनी व्यक्त केली.

---

## माहिती अधिकार कायद्यातील प्रस्तावित बदलांना स्थगिती; कार्यकर्त्यांना दिलासा

### अण्णा हजारे यांच्या हस्तक्षेपानंतर मुख्यमंत्र्यांची भूमिका; सविस्तर चर्चेअंतीच निर्णय घेण्याचे निर्देश

**जन सम्राट टाईम्स**

**भुसावळ | प्रतिनिधी :** माहिती अधिकार (आरटीआय) कायद्यांतर्गत प्रस्तावित नियमांमध्ये करण्यात आलेल्या बदलांना अखेर स्थगिती देण्यात आली आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी राज्य माहिती आयोगाला पत्र पाठवून संबंधित विषयावर सविस्तर चर्चा झाल्याशिवाय कोणताही अंतिम निर्णय घेऊ नये, असे निर्देश दिल्यानंतर आयोगाने प्रस्तावित बदलांना स्थगिती दिली. या निर्णयामुळे माहिती अधिकार कार्यकर्ते आणि पारदर्शक प्रशासनासाठी काम करणाऱ्या संघटनांना मोठा दिलासा मिळाला आहे. माहिती अधिकार कायद्याच्या नियमांमध्ये शुल्कवाढ, अर्जातील शब्दमर्यादा, नागरिकत्वाचा पुरावा अनिवार्य करणे, माहिती मागण्याचे कारण नमूद करण्याची अट आणि अपील शुल्क लागू करण्यासह अनेक बदल प्रस्तावित करण्यात आले होते. या बदलांमुळे माहिती मिळविण्याची प्रक्रिया अधिक क्लिष्ट होणार असल्याची टीका विविध स्तरांतून होत होती. या प्रस्तावित बदलांविरोधात ज्येष्ठ समाजसेवक अण्णा हजारे यांनी तीव्र भूमिका घेत आंदोलनाचा इशारा दिला होता. तसेच त्यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना पत्र लिहून नागरिकांच्या माहितीच्या अधिकारावर गदा आणणारे बदल मागे घेण्याची मागणी केली होती. एका अर्जात फक्त एकच विषय आणि १५० शब्दांची मर्यादा. मुख्यमंत्र्यांच्या पत्रानंतर राज्य माहिती आयोगाने १२ जून रोजी राजपत्रात प्रसिद्ध करण्यात आलेल्या प्रस्तावित बदलांना स्थगिती दिली आहे. संबंधित नियमांवर सर्व संबंधित घटकांशी चर्चा करूनच पुढील निर्णय घेतला जाईल, असेही स्पष्ट करण्यात आले आहे.

---

## स्व. जिजाबाई परदेशी यांच्या स्मरणार्थ ५७७ वृक्षांचे वृक्षारोपण

**जन सम्राट टाईम्स**

भडगाव (प्रतिनिधी) : जळगाव जिल्ह्यातील भडगाव तालुक्यातील बांबरुड पाटस्थळ येथील स्वर्गवासी जिजाबाई उर्फ कोंडामाई संतोषसिंग परदेशी यांचे दिनांक १७ जून २०२६ रोजी दुःखद निधन झाले. त्यांच्या पवित्र स्मृतीस चिरंतन अभिवादन म्हणून कानोबा महाराज (कानिफनाथ महाराज) मंदिर परिसरात , टेकडीवर ५७७ वृक्षांचे वृक्षारोपण करण्यात आले. या उपक्रमात वड, पिंपळ, निंब यांसारख्या पर्यावरणपूरक व दीर्घायुषी वृक्षांची लागवड करण्यात आली. "एका व्यक्तीच्या स्मृतीला निसर्गसंवर्धनाची जोड देत भावी पिढ्यांसाठी हिरवा वारसा निर्माण करणे" हा या उपक्रमामागील मुख्य उद्देश होता. यावेळी पूर्ण बांबरुड ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. तसेच स्व. कोंडामाई



यांचे चिरंजीव मा. रवींद्रसिंग संतोषसिंग परदेशी (पोलीस अधीक्षक, एसआरपीएफ, पुणे), डॉ. अरुणा राजपूत (कृष्णा हॉस्पिटल, सिल्लोड), डॉ. करूणा संतोषसिंग परदेशी, श्री. दिनकर कौतिक पाटील, श्री. जितेंद्र जयसिंग परदेशी, श्री. अक्षय संजय परदेशी, श्री. मनोज परदेशी तसेच परदेशी परिवारातील सदस्य आणि ग्रामस्थांनी वृक्षारोपण करून स्व. कोंडामाई यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण केली. या उपक्रमाचे ग्रामस्थांनी मनापासून स्वागत केले असून, "स्मृती अमर राहतात, जेव्हा त्या निसर्गाच्या रूपाने फुलतात" असा भाव यावेळी सर्वांनी व्यक्त केला.

---

## १२१ वर्षांची अखंड परंपरा: बोरगाव ते पंढरपूर पायी दिंडीचे भक्तिमय वातावरणात प्रस्थान!

### १२१ वर्षांची गौरवशाली परंपरा • बोरगाव ते पंढरपूर पायी दिंडी रवाना


**जन सम्राट टाईम्स**

**बोरगाव। प्रतिनिधी :** प्रतिनिधी धरणगाव तालुक्यातील बोरगाव येथून श्रीक्षेत्र पंढरपूरकडे जाणाऱ्या १२१ वर्षांची गौरवशाली परंपरा लाभलेल्या पायी दिंडी सोहळ्याला शनिवारी (दि. ४ जुलै) भक्तिमय वातावरणात प्रारंभ झाला. वै. ह.भ.प. तुकाराम महाराज बोरगांवकर यांच्या प्रेरणेने सुरू झालेली ही वारी परंपरा आजही अखंडपणे जोपासली जात असून, यंदाही शेकडो वारकऱ्यांनी विठ्ठलनामाचा अखंड गजर करत पंढरपूरकडे प्रस्थान केले.

ज्येष्ठ कृष्ण चतुर्थीच्या शुभमुहूर्तावर गावातील नगरप्रदक्षिणेनंतर दिंडीची वाटचाल सुरू झाली. टाळ-मृदुंगाच्या निनादात, अभंग-भजनांच्या सुरावटीत आणि "ज्ञानोबा-तुकाराम", "पांडुरंग हरी"च्या जयघोषाने संपूर्ण बोरगाव परिसर भक्तिमय वातावरणाने भारावून गेला.



यंदाच्या दिंडीचे नेतृत्व ह.भ.प. प्रभाकर नामदेव कंखरे हे दिंडीचालक म्हणून करीत असून, त्यांच्या मार्गदर्शनाखाली शिस्तबद्ध आणि भक्तिभावपूर्ण वातावरणात दिंडी पुढे सरकत आहे. वारकरी टाळांच्या तालावर फुगड्या खेळत, अभंग गात आणि विठ्ठलाचे अखंड नामस्मरण करत पंढरपूरच्या दिशेने मार्गस्थ झाले. या ऐतिहासिक दिंडीत बोरगावसह पंचक्रोशीतील अनेक गावांमधील वारकऱ्यांनी मोठ्या संख्येने सहभाग नोंदविला. बोरगाव खुर्द, टोळी, धरणगाव, एरंडोल, विवरे, भालगाव, पातरखेडा, जळू, नांदखुर्द, कासोदा, आडगाव, पायसखेडा, सागवी, विटनेर, नंदगाव, भवरखेडा, राजवड, भोणे, लोणे, कंडारी, रोटवद आणि पाळधी आदी गावांतील वारकरी दिंडीत सहभागी झाले. दिंडी मार्गावर ठिकठिकाणी ग्रामस्थांनी वारकऱ्यांचे स्वागत करून त्यांना शुभेच्छा दिल्या. वारी ही केवळ धार्मिक परंपरा नसून समता, बंधुता, सेवा आणि भक्तीचा संदेश देणारी जीवनसंस्कृती असल्याची भावना यावेळी अनेक वारकऱ्यांनी व्यक्त केली.आषाढी एकादशीच्या निमित्ताने दरवर्षी निघणारी ही ऐतिहासिक दिंडी बोरगावच्या सांस्कृतिक आणि आध्यात्मिक वारशाचे प्रतीक मानली जाते. गेल्या १२१ वर्षांपासून अखंड सुरू असलेल्या या परंपरेमुळे नव्या पिढीतही वारकरी संप्रदायाचे संस्कार रुजत असून, विठ्ठलभक्तीचा संदेश घराघरांत पोहोचत आहे. यंदाही "विठ्ठल... विठ्ठल..."च्या अखंड नामगजरात आणि संतांच्या अभंगांच्या सुरावटीत बोरगावची ऐतिहासिक दिंडी श्रीक्षेत्र पंढरपूरच्या दिशेने भक्तिभावाने मार्गस्थ झाली.



# समग्र शिक्षा अभियानांतर्गत 53 दिव्यांग विद्यार्थ्यांना सहाय्यभूत साहित्यांचे वाटप

## दिव्यांगांच्या विकासासाठी कटिबद्ध: पालकमंत्री गुलाबराव पाटील

जन सम्राट टाईम्स



**जळगाव | प्रतिनिधी :** "शासन दिव्यांग बांधवांच्या पाठीशी खंबीरपणे उभे आहे. मात्र केवळ शासनानेच नव्हे, तर समाजातील सेवाभावी संस्था, उद्योग आणि दानशूर व्यक्तींनीही पुढे येऊन दिव्यांगांच्या सर्वांगीण विकासासाठी हातभार लावला पाहिजे. दिव्यांगांची सेवा हीच खरी ईश्वरसेवा असून त्यांच्या चेहऱ्यावरचे हास्य आणि आयुष्यात निर्माण होणारा आत्मविश्वास हेच सर्वात मोठे समाधान आहे," असे प्रतिपादन पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री तथा जळगाव जिल्ह्याचे पालकमंत्री गुलाबराव पाटील यांनी केले.

जळगाव पंचायत समितीच्या सभागृहात समग्र शिक्षा अभियानाच्या समावेशित शिक्षण विभागामार्फत आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते. यावेळी पालकमंत्री गुलाबराव पाटील यांच्या हस्ते जळगाव तालुक्यातील ३८ दिव्यांग विद्यार्थ्यांना त्यांच्या गरजेनुसार व्हीलचेअर, सीपी व्हीलचेअर, डिजिटल श्रवणयंत्रे, टीएलएम किट, रोलॅटर, वॉकिंग स्टिक तसेच इतर सहाय्यभूत साहित्यांचे वितरण करण्यात आले. याशिवाय १५ मतिमंद विद्यार्थ्यांना विशेष एमआर किटचेही वाटप करण्यात आले. यावेळी बोलताना पालकमंत्री पाटील म्हणाले की, प्रत्येक दिव्यांग विद्यार्थी हा समाजाची अमूल्य संपत्ती आहे.

योग्य संधी, आधुनिक साधने आणि दर्जेदार शिक्षण उपलब्ध झाल्यास दिव्यांग विद्यार्थीही विविध क्षेत्रांत उल्लेखनीय यश संपादन करू शकतात. त्यामुळे त्यांच्याकडे दयेच्या भावनेने नव्हे, तर समानतेच्या, सन्मानाच्या आणि विश्वासाच्या दृष्टीने पाहण्याची गरज आहे.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन उपशिक्षक सुशील पवार यांनी केले. यावेळी प्राथमिक शिक्षणाधिकारी निलेश पाटील, गटविकास अधिकारी चंद्रकांत बोडरे, शिक्षक सेनेचे जिल्हाध्यक्ष नरेंद्र सपकाळे, गटशिक्षणाधिकारी अजित तडवी, माजी सभापती पती जनाआप्पा कोळी, दूध संघाचे रमेशआप्पा पाटील, तालुकाप्रमुख शिवराज पाटील, शिक्षण विस्तार अधिकारी जितेंद्र चिंचोले, अल्लाउद्दीन बेलदार, विजय पवार यांच्यासह समग्र शिक्षा अभियान व शिक्षण विभागातील अधिकारी-कर्मचारी, विशेष शिक्षक, दिव्यांग विद्यार्थी, त्यांचे पालक आणि मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### दिव्यांगांची सेवा हीच खरी ईश्वरसेवा

शासन, प्रशासन, शिक्षक, पालक आणि समाज यांनी एकत्रितपणे प्रयत्न केल्यास दिव्यांग विद्यार्थ्यांना समाजाच्या मुख्य प्रवाहात आणणे शक्य होईल, असेही त्यांनी सांगितले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक गटशिक्षणाधिकारी अजित तडवी यांनी केले. त्यांनी समग्र शिक्षा अभियानांतर्गत राबविण्यात येणाऱ्या विविध योजना, त्यांची उद्दिष्टे तसेच विद्यार्थ्यांना उपलब्ध करून दिल्या जाणाऱ्या सुविधांची माहिती दिली.

# हतनूर धरणाचे २२ दरवाजे १ मीटरने उघडले

## तापी नदीकाठच्या गावांना हायअलर्ट

जन सम्राट टाईम्स



**भुसावळ । प्रतिनिधी :** जळगाव जिल्ह्यातील महत्त्वाच्या हतनूर धरणाच्या पाणलोट क्षेत्रात सुरू असलेल्या मुसळधार पावसामुळे धरणाची पाणीपातळी वेगाने वाढली आहे. आज सकाळी १० वाजेच्या अहवालानुसार धरणाचे २२ दरवाजे १ मीटरने उघडण्यात आले असून, तापी नदीपात्रात ४९ हजार ५८२ क्युसेक (१,४०४ क्युमेक्स) वेगाने पाण्याचा विसर्ग सुरू करण्यात आला आहे. यामुळे तापी नदीकाठच्या गावांना प्रशासनाने हायअलर्ट जारी करत सतर्क राहण्याचे आवाहन केले आहे.

गेल्या काही तासांत धरण परिसरात २८ मिमी पावसाची नोंद झाली असून, हंगामातील एकूण पाऊस ७६ मिमीवर पोहोचला आहे. धरणाची सध्याची पाणीपातळी २१२.१८० मीटर असून, एकूण क्षमता २१४.००० मीटर आहे. धरणात सध्या २८९.०० दलघमी (७४.४८ टक्के) एकूण पाणीसाठा असून, त्यापैकी १५६.०० दलघमी (६१.१८ टक्के) जिवंत पाणीसाठा उपलब्ध आहे.

पूर नियंत्रणाच्या दृष्टीने धरणातील २२ वक्राकार दरवाजे उघडून तापी नदीत मोठ्या प्रमाणात पाणी सोडण्यात येत आहे.

याशिवाय मुख्य कालव्यातूनही ३०० क्युसेक (८.५० क्युमेक्स) वेगाने विसर्ग सुरू असून, उजवा कालवा सध्या बंद ठेवण्यात आला आहे. दरम्यान, हतनूर धरणाच्या पाणलोट क्षेत्रात बऱ्हाणपूर (५२ मिमी), देडतलाई (५८.२ मिमी), टेक्सा (२७.२ मिमी), एरंडी (३२ मिमी), चिखलदरा (८२.२ मिमी), लोहारा (२१ मिमी) यांसह विविध भागांत एकूण ३८८.४ मिमी पावसाची नोंद झाली आहे.

हतनूर परिसरातही ८८ मिमी पाऊस झाला आहे. पावसाचा जोर कायम असल्याने तापी नदीच्या काठावरील गावांतील नागरिकांनी नदीपात्रात जाणे टाळावे, तसेच प्रशासनाच्या सूचनांचे पालन करावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

जन सम्राट टाईम्स ब्रेक न्यूज

# विनापरवाना गुंगीकारक कफ सिरपची वाहतूक उधळली!

## १६० बाटल्यांसह आरोपी जेरबंद



जन सम्राट टाईम्स

**धुळे । प्रतिनिधी :** मानवी मेंदूवर विपरीत परिणाम करणाऱ्या गुंगीकारक कफ सिरपची विनापरवाना विक्री रोखण्यासाठी धुळे स्थानिक गुन्हे शाखेने (एलसीबी) मोठी कारवाई करत १६० कफ सिरपच्या बाटल्यांसह एका संशयिताला अटक केली आहे. शिंदखेडा शहरातील रेल्वे स्टेशन रोडवरील कुमरेज फाट्याजवळ सापळा रचून ही कारवाई करण्यात आली असून, जप्त मुद्देमालाची किंमत ₹१८ हजार ४०० इतकी आहे.

धुळे जिल्ह्याचे पोलीस अधीक्षक विशाल आनंद यांनी गुंगीकारक औषधांची बेकायदेशीर विक्री व साठा करणाऱ्यांविरोधात कठोर कारवाई करण्याचे निर्देश स्थानिक गुन्हे शाखेला दिले होते. त्यानुसार पोलीस निरीक्षक ज्ञानेश्वर वारे यांना मिळालेल्या गोपनीय माहितीच्या आधारे विशेष पथकाने कारवाई केली. मिळालेल्या माहितीनुसार, किरण वसंत सकट (रा. मच्छी बाजार, शिरपूर) हा सुरत येथून शिंदखेडा मार्गे शिरपूरकडे गुंगीकारक कफ सिरपच्या बाटल्या विक्रीसाठी घेऊन जात असल्याची माहिती पोलिसांना मिळाली होती. त्यानंतर राजपत्रित अधिकारी व दोन शासकीय पंचांच्या उपस्थितीत कुमरेज फाट्याजवळ सापळा रचण्यात आला. संशयिताला अडवून त्याच्याकडील दोन काळ्या रंगाच्या बॅगांची तपासणी केली असता, त्यामध्ये मानवी मेंदूवर विपरीत परिणाम करणाऱ्या कफ सिरपच्या १६० बाटल्या आढळून आल्या. या बाटल्यांची एकूण किंमत ₹१८,४०० असल्याचे पोलिसांनी सांगितले. याप्रकरणी शिंदखेडा पोलीस ठाण्यात आरोपीविरुद्ध भारतीय न्याय संहिता (BNS) कलम १२३, २७८, तसेच गुंगीकारक औषधी द्रव्य आणि मनोव्यापारावर परिणाम करणारे पदार्थ अधिनियम, १९८५ मधील संबंधित कलमे आणि औषधी द्रव्य व सौंदर्य प्रसाधन अधिनियम, १९४० अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या रॅकेटमध्ये आणखी कोणाचा सहभाग आहे, याचा सखोल तपास सुरू आहे. ही कारवाई पोलीस अधीक्षक विशाल आनंद, अपर पोलीस अधीक्षक अजय देवरे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक ज्ञानेश्वर वारे, सपोनि दीपक ढोके तसेच पोलीस अंमलदार प्रशांत चौधरी, चेतन बोरसे, संतोष हिरे, कमलेश सूर्यवंशी, विनायक खैरनार, हर्षल चौधरी, राहुल गिरी, प्रशांत माळे आणि संजय सुरसे यांच्या पथकाने यशस्वीरीत्या पार पाडली. गुंगीकारक औषधांच्या बेकायदेशीर विक्रीविरोधातील या कारवाईमुळे अशा प्रकारच्या अवैध व्यवसायाला आळा बसण्यास मदत होणार असल्याचे पोलिसांनी सांगितले आहे.

# जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेप्रकरणी तक्रारीची दखल

जन सम्राट टाईम्स



**जळगाव । प्रतिनिधी :** जळगाव जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि. संदर्भात लोकनियुक्त सरपंच तथा तक्रारदार श्री. सुरेशआप्पा गो. पाटील (झुरखेडा, ता. धरणगाव, जि. जळगाव) यांनी सादर केलेल्या तक्रार अर्जाची सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी दखल घेतली आहे. या प्रकरणी विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था, नाशिक यांना त्वरित आवश्यक कार्यवाही करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. दि. २ जुलै २०२६ रोजी जारी करण्यात आलेल्या पत्रानुसार, श्री. पाटील यांनी ३० जून २०२६ रोजी सादर केलेल्या अर्जामध्ये जळगाव जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेत बँकिंग कायदा (सुधारणा) अधिनियम, २०२५, भारतीय रिझर्व्ह बँकेच्या (RBI) मार्गदर्शक सूचना तसेच महाराष्ट्र शासनाच्या आदेशांचे उल्लंघन झाल्याचा आरोप करण्यात आला आहे. तक्रारीत बँकेतील कथित नियमबाह्य कारभाराची सखोल चौकशी करून संबंधित अधिकारी व संचालकांवर कायदेशीर आणि प्रशासकीय कारवाई करण्याची मागणी करण्यात आली आहे. सहकार आयुक्त कार्यालयाने हे निवेदन विचारात घेऊन संबंधित विभागाला धोरण व शासन निर्णयांच्या अनुषंगाने आवश्यक ती कार्यवाही करून अर्जदारास कळविण्याचे निर्देश दिले आहेत. या घडामोडीमुळे जळगाव जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या कारभाराबाबत नव्याने चर्चा सुरू झाली असून, विभागीय स्तरावर होणाऱ्या पुढील चौकशी आणि निर्णयाकडे सहकार क्षेत्राचे लक्ष लागले आहे.

# २४ तासांत जबरीचोरीचा पर्दाफाश; चाळीसगाव रोड पोलिसांची धडाकेबाज कारवाई

## विधीसंघर्षग्रस्त बालकासह चौघांच्या टोळीचा भांडाफोड

जन सम्राट टाईम्स



**धुळे (प्रतिनिधी):** धुळे शहरातील शंभर फूट रोड परिसरात झालेल्या जबरीचोरी आणि मारहाणीच्या गुन्ह्याचा अवघ्या २४ तासांत छडा लावत चाळीसगाव रोड पोलिसांनी उल्लेखनीय कामगिरी केली आहे. या कारवाईत विधीसंघर्षग्रस्त बालकासह चौघांच्या टोळीचा पर्दाफाश करण्यात आला असून, ₹५४ हजार ५०० किमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

याप्रकरणी एका आरोपीला अटक करण्यात आली असून, दोन फरार आरोपींचा शोध सुरू आहे. ३० जून २०२६ रोजी मध्यरात्री साडेबारा वाजण्याच्या सुमारास धुळे शहरातील शंभर फूट रोडवरील डी-मार्टजवळ आणि बंद असलेल्या शासकीय दूध डेअरीच्या परिसरात फिर्यादी शोएब शब्बीर शहा (वय ३२, रा. म्हसदी, ता. धुळे) यांना अडवून तीन अज्ञात आरोपींनी मारहाण केली.

त्यानंतर त्यांच्या शर्टच्या खिशातील विवो कंपनीचा मोबाईल, ₹४ हजारांची रोख रक्कम तसेच मोबाईलद्वारे ₹९०० ऑनलाईन ट्रान्सफर करून जबरीचोरी केली. या प्रकरणी चाळीसगाव रोड पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता. गुन्ह्याचे गांभीर्य लक्षात घेऊन प्रभारी अधिकारी सपोनि विवेक पवार यांच्या नेतृत्वाखालील पथकाने तांत्रिक विश्लेषण आणि गोपनीय माहितीच्या आधारे एका विधीसंघर्षग्रस्त बालकाला ताब्यात घेतले.

चौकशीत त्याने चिरंतन ऊर्फ दादू सतीश गवळी, हर्षल राजेंद्र मेढे आणि वृत्ताय ऊर्फ दस दिनेश पाटील यांच्या साथीने जबरीचोरी केल्याची कबुली दिली.

चौकशीदरम्यान आरोपींकडून लुटलेला मोबाईल, रोख रक्कम आणि गुन्ह्यात वापरण्यात आलेली मोटारसायकल असा ₹५४,५०० किमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. त्यानंतर पोलिसांनी हर्षल राजेंद्र मेढे याला अटक केली असून, उर्वरित दोन आरोपींचा शोध सुरू आहे. पोलिसांच्या माहितीनुसार, अटक करण्यात आलेल्या हर्षल मेढे याच्याविरुद्ध यापूर्वीही गंभीर स्वरूपाचे गुन्हे दाखल आहेत. त्यामुळे या टोळीचा इतर गुन्ह्यांशीही संबंध आहे का, याचा तपास पोलीस करत आहेत.

# ॲड. साबळे यांच्या वाढदिवसानिमित्त रक्तदान व महावृक्षारोपण सप्ताह!

जन सम्राट टाईम्स

**बोरघर/माणगाव | प्रतिनिधी :** माणगाव शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष ॲड. राजीव साबळे यांच्या ६१ व्या वाढदिवसानिमित्त १ ते ७ जुलै या कालावधीत विविध सामाजिक उपक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. माणगाव शिक्षण प्रसारक मंडळ आणि ॲड. राजीव साबळे हितचिंतक मित्र मंडळाच्या संयुक्त विद्यमाने रक्तदान शिबिरे आणि महावृक्षारोपण सप्ताहाचा संकल्प राबविण्यात येत असून, या उपक्रमांना नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे. या उपक्रमाच्या तिसऱ्या दिवशी माणगाव शहरातील क्रांतीनगर येथे क्रांतीनगर रहिवासी मित्र मंडळाच्या सहकार्याने रक्तदान शिबिर आणि वृक्षारोपण कार्यक्रम उत्साहात पार पडला. परिसरात मोठ्या प्रमाणावर वृक्षलागवड करून पर्यावरण संरक्षणाचा संदेश देण्यात आला, तसेच रक्तदानाद्वारे समाजाप्रती आपली जबाबदारी पार पाडण्याचे आवाहन करण्यात आले. कार्यक्रमाला क्रांतीनगर रहिवासी मित्र मंडळाचे अध्यक्ष ॲड. पंकज लक्ष्मण खामगावकर, उपाध्यक्ष मयूर गुरव, सचिव भूषण सिसोदे, कार्याध्यक्ष बळीराम मोरे, सहसचिव राजेंद्र मराठे, नगरसेवक अजित तार्लेकर, मोरे गुरुजी, नरेश राजपूत, आदर्श मोरे, राहुल पाटील, इंद्रनील पाटील, नागेश पाटील यांच्यासह परिसरातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी माणगावच्या नगराध्यक्षा शर्मिला सुर्वे, माणगाव सिनियर कॉलेजचे प्राचार्य डॉ. जयशंकर पांडे, प्रा. राजेंद्र आचार्य, अस्थिरोग तज्ज्ञ डॉ. माळी, दंतरोग तज्ज्ञ डॉ. अमेय उभारे, फिजिशिअन डॉ. गांधी तसेच महाविद्यालयातील प्राध्यापक, कर्मचारी, विद्यार्थी आणि नागरिकांनीही सहभाग घेतला. सर्व मान्यवरांच्या हस्ते वृक्षारोपण करण्यात आले. आयोजकांच्या वतीने सांगण्यात आले की, रक्तदान आणि पर्यावरण संवर्धन या दोन्ही सामाजिक बांधिलकीच्या उपक्रमांद्वारे समाजात सकारात्मक संदेश देण्याचा प्रयत्न करण्यात येत असून, सप्ताहभर विविध सामाजिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येणार आहे.

# शिवछत्रपतींच्या विचाराने प्रेरित नेतृत्व; संजय हंडोरे पाटील यांच्या कार्याचा प्रेरणादायी प्रवास

जन सम्राट टाईम्स



**मुरबाड | प्रतिनिधी :** अखिल भारतीय कुर्मी क्षत्रिय महासभेचे महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष आणि कोकण विभागीय पत्रकार संघाचे संस्थापक अध्यक्ष ॲड. संजय हंडोरे पाटील यांचा ५ जुलै रोजी वाढदिवस साजरा होत असून, त्यांच्या सामाजिक, शैक्षणिक आणि संघटनात्मक कार्याचा आढावा घेतला जात आहे. शिवछत्रपतींच्या विचारांना जीवनाचे ध्येय मानत त्यांनी ग्रामीण विकास, पर्यावरण संवर्धन, व्यसनमुक्ती, पत्रकार संघटन आणि समाजकारणात वेगळी ओळख निर्माण केली आहे.

ठाणे जिल्ह्यातील मुरबाड तालुक्यातील भादाणे या गावातील शेतकरी कुटुंबात जन्मलेल्या संजय हंडोरे पाटील यांनी वयाच्या अवघ्या १३व्या वर्षी दरड दुर्घटनेत अडकलेल्या तिघांना वाचविणे आणि १६व्या वर्षी विहिरीत पडलेल्या व्यक्तीचे प्राण वाचविणे, या घटनांमुळे त्यांची धैर्यवान व्यक्तिमत्त्वाची ओळख निर्माण झाली.

सरपंच म्हणून कार्यरत असताना गावात दारूबंदीची प्रभावी अंमलबजावणी केली. महिलांना मालमत्तेत समान हक्क मिळावा यासाठी घरपट्टीवर पती-पत्नीची संयुक्त नोंद करण्याची अभिनव संकल्पना त्यांनी राबविली.

पर्यावरण संवर्धनासाठी सुमारे ३० हजार साग वृक्षांची लागवड, युवकांमध्ये वृक्षसंवर्धनाची जनजागृती तसेच विविध सामाजिक व सांस्कृतिक उपक्रमांद्वारे त्यांनी गावाच्या विकासात मोलाचे योगदान दिले. १५ ऑगस्ट आणि २६ जानेवारी रोजी शाळेतील गुणवंत विद्यार्थ्यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्याचा अभिनव उपक्रम त्यांनी सुरू केला या उपक्रमाबद्दल त्यांचा विविध राष्ट्रीय मंचांवर गौरवही करण्यात आला आहे. संघटन आणि सामाजिक चळवळीतील सक्रिय नेतृत्व स्वतंत्र कोकण राज्याच्या मागणीसाठी झालेल्या आंदोलनात त्यांनी सक्रिय सहभाग घेतला. पत्रकारांच्या प्रश्नांसाठी कोकण विभागीय पत्रकार संघाची स्थापना करून त्यांनी सातत्याने आवाज उठविला. कला क्षेत्रातही ते फ्रेंड्स फिल्म क्रिएशनचे संचालक म्हणून कार्यरत आहेत.

जन सम्राट टाईम्स अँकर न्यूज

# "BLO सोबत खांद्याला खांदा लावून काम करा; लोकशाहीच्या सेवेसाठी सज्ज व्हा"

## जळगाव ग्रामीणमध्ये SIR मोहिमेचा अंतिम टप्पा; BLA कार्यकर्त्यांना पालकमंत्री गुलाबराव पाटील यांचे मार्गदर्शन

जन सम्राट टाईम्स

**पाळधी/धरणगाव । प्रतिनिधी:** जळगाव ग्रामीण मतदारसंघातील विशेष मतदार यादी पुनरावलोकन (SIR) मोहिमेच्या अंतिम टप्प्याच्या पार्श्वभूमीवर पाळधी येथील सुगोकी रिसॉर्टमध्ये शिवसेनेच्या बूथ लेव्हल एजंट (BLA) कार्यकर्त्यांची मार्गदर्शन बैठक उत्साहात पार पडली. पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री गुलाबराव पाटील यांनी कार्यकर्त्यांना मार्गदर्शन करत, "BLA हा प्रत्येक बूथचा किल्लेदार आणि समन्वयक आहे. BLO सोबत खांद्याला खांदा लावून प्रामाणिकपणे काम करा आणि लोकशाहीच्या सेवेसाठी सज्ज व्हा," असे आवाहन केले. पालकमंत्री पाटील यांनी सांगितले की, राज्याचे उपमुख्यमंत्री तथा शिवसेनेचे मुख्य नेते एकनाथ शिंदे यांनी राज्यातील दीड लाखांहून अधिक BLA कार्यकर्त्यांचा विमा उतरविण्याचा निर्णय घेतला आहे. त्यामुळे प्रत्येक कार्यकर्त्याने आपली जबाबदारी गांभीर्याने पार पाडावी, असे त्यांनी स्पष्ट केले. बैठकीत SIR मोहिमेच्या अंतिम टप्प्यातील नियोजन, घरभेटी, नवमतदार नोंदणी, स्थलांतरित



नागरिकांशी संपर्क, BLO-BLA समन्वय आणि प्रत्येक पात्र मतदारापर्यंत पोहोचण्याच्या कार्यपद्धतीबाबत सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले. तसेच पालकमंत्री गुलाबराव पाटील यांचा Enumeration Form (EF) भरून त्याचे डिजिटायझेशनही करण्यात आले. स्वीय सहाय्यक प्रथमेश मोहोड यांनी सादरीकरणाद्वारे BLA कार्यकर्त्यांच्या भूमिका, जबाबदाऱ्या आणि कर्तव्यांची माहिती दिली.

जळगाव जिल्ह्यात SIR मोहिमेच्या अंमलबजावणीत जळगाव ग्रामीण मतदारसंघ तिसऱ्या क्रमांकावर असल्याची माहिती त्यांनी यावेळी दिली. यावेळी पालकमंत्री गुलाबराव पाटील यांनी कार्यकर्त्यांना उद्देशून सांगितले की, मॅपिंगचे काम मोठ्या प्रमाणावर पूर्ण झाले असून आता प्रत्यक्ष घरभेटींचा महत्त्वाचा टप्पा सुरू झाला आहे. घर बंद असल्यास पुन्हा भेट द्यावी, बाहेरगावी असलेल्या नागरिकांशी संपर्क साधावा तसेच ज्येष्ठ नागरिक, दिव्यांग, स्थलांतरित महिला आणि नवमतदारांपर्यंत स्वतःहून पोहोचून अचूक माहिती नोंदवावी. अचूक मतदार यादी ही सक्षम लोकशाहीची खरी ताकद असल्याचे त्यांनी नमूद केले. बैठकीत मागील बैठकीत दिलेला शब्द पाळत जळगाव ग्रामीण मतदारसंघातील BLA कार्यकर्त्यांना मानधनाचे वितरण करण्यात आले. विशेष मतदार यादी पुनरावलोकन मोहिमेत जबाबदारीने काम करणाऱ्या कार्यकर्त्यांचा सन्मानही करण्यात आला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक युवानेते तथा माजी जिल्हा परिषद सदस्य प्रतापराव पाटील यांनी केले. सूत्रसंचालन जळगाव तालुकाप्रमुख शिवराज पाटील यांनी, तर आभार धरणगाव तालुकाप्रमुख डी. ओ. पाटील यांनी मानले.

### युवासेनेचे पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते

यावेळी युवा नेते प्रतापराव पाटील, जळगाव महानगरपालिकेचे उपमहापौर मनोज चौधरी, पंचायत समितीचे माजी सभापती नंदलाल पाटील, अनिल पाटील, सचिन पवार, रमेश दूध संघाचे संचालक रमेश (आप्पा) पाटील, तालुकाप्रमुख डी. ओ. पाटील, शिवराज पाटील तसेच जळगाव ग्रामीण मतदारसंघातील BLA, शिवसेना व युवासेनेचे पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

Printed, published and Owned by Mukundrao Shamrao Nannaware, and printed at Shri Samarth Krupa Digital Printers, Plot No. 16. S.R. No.39/1 Sadguru Nagar, MIDC Jalgaon-425001 and published at 2nd FLOOR, BALAJI SANKUL, NEAR KHAJAMIYA CHOUK, JALGAON (MS.) PIN - 425001, Editor - Mukundrao Shamrao Nannaware Title Code - T/MH/2026/0422/5204/1306